**सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या जागी अनुकंपा तत्वावर त्यांच्या नातेवाईकाची नियुक्ती करण्याबाबतचे निकष ठरविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**
**शासन निर्णय क्र. एसजीए-२०१८/प्र.क्र.६४४/कामगार-५**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक: २७ डिसेंबर, २०१८.**

संदर्भ :- शासन निर्णय क्र.एसजीए-१५०८/प्र.क्र.१४६६ (अ)/कामगार-५, दि.१५.०७.२००९.

प्रस्तावना :-

सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या जागी अनुकंपा तत्वावर त्यांच्या नातेवाईकाची नियुक्ती करण्याबाबत ठरविण्यात आलेल्या निकषांमध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती याबाबत शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय :-

सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या जागी अनुकंपा तत्वावर त्यांच्या नातेवाईकाची नियुक्ती करण्याबाबत दि.१५.०७.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या निकषांमध्ये पुढीलप्रमाणे सुधारीत निकष अंतर्भूत करण्यात येत आहेत.

१) दि.१५.०७.२००९ च्या शासन निर्णयानुसार सुरक्षा रक्षक यांच्या नातेवाईकाची अनुकंपा तत्वावर नियुक्ती करताना जर शैक्षणिक पात्रतेच्या व्यतिरिक्त इतर सर्व अटी पूर्ण करीत असल्यास, त्यांच्याबाबतीत सुरक्षा रक्षकांच्या नेमणूकीसाठीची शैक्षणिक अर्हतेची अट शिथिल करण्यासंबंधी नियुक्ती प्राधिकारी म्हणून संबंधित सुरक्षा रक्षक मंडळाने उचित निर्णय घ्यावा.
२) वरील अटी व्यतिरिक्त दि.१५.०७.२००९ रोजीच्या शासन निर्णयातील सर्व अटी यापुढेही लागू राहतील
३) सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांच्या जागी अनुकंपा तत्वावर त्यांच्या नातेवाईकाची नियुक्ती करण्याबाबतचे प्रस्ताव संबंधित सुरक्षा रक्षक मंडळाच्या स्तरावरच अंतिम करण्यात यावेत.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक २०१८१२२७१२०७४८४८१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Dr.Shrikant L. Pulkundwar

Digitally signed by Dr.Shrikant L. Pulkundwar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=feb24b5f5d1512bb47f7bae5ad1db4953358cd43c999bdf0814c6bb78364d50a, serialNumber=c10a1e6c8fbe08c1180978bd3ed8a151ed05202d522b09b9960341c2f080906d, cn=Dr.Shrikant L. Pulkundwar
Date: 2018.12.27 17:14:24 +05'30'

**( डॉ.श्रीकांत ल. पुलकुंडवार )**
**शासनाचे उप सचिव**

प्रत:-

१. मा.राज्यपाल यांचे सचिव (पत्राने)
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय,मंत्रालय,मुंबई
३. मा.मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,
४. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, अ-६, मंत्रालय समोर,नरिमन पॉईट, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई,
६. मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
८. प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई-३२,
९. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहाय्यक, मुंबई,
१०. कामगार आयुक्त, कामगार भवन, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा, मुंबई,
११. सर्व सह/ उप सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१३. अध्यक्ष, सर्व सुरक्षा रक्षक मंडळे,
१४. सर्व अवर सचिव /कार्यासन अधिकारी, कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई,
१५. निवड नस्ती (कामगार-५).